**गैरअर्जदार क्र ०१ व ०२ तर्फे साक्षीदार क्र ०२**

**उलटतपास गैरअर्जदार क्र ०३ व ०४ तर्फे ॲड. एस. के. अन्सार यांचेकडून —**

१. **गैरअर्जदार क्र ०३, ०४ व त्यांचे वकील पुकारले असता गैरहजर. म्हणुन या साक्षीदारास गैरअर्जदार क्र ०३ व ०४ तर्फे उलटतपास नाही.**

**उलटतपास गैरअर्जदार क्र ०५ तर्फे ॲड. ए. व्ही. चिद्दरवार यांचेकडून.**

२. नाकारला.

**उलटतपास गैरअर्जदार क्र ०६ तर्फे ॲड. ए. व्ही. चिद्दरवार यांचेकडून.**

३. माझे व गैरअर्जदार क्र ०६ च्या अधिका—यांचे संबंध सन १९९८ पासुन चांगले आहेत. विमा कंपनीत विमा पॉलीसीबद्दल होणा—या सर्व व्यवहारांबाबत मला माहित आहे. गैरअर्जदार क्र.०६ चे २००७ पासुनचे अभिलेख संगणीकृत आहेत. प्रिमियमची रक्कम स्वीकारणे, धनादेश, डी. डी. स्वीकारणे, विमा पॉलीसी जारी करणे, रद्द करणे हे सर्व व्यवहार संगणीकृत आहेत. डी.डी. जमा केला तर त्याची पावती तयार केली जाते.

**प्रश्न** — डी.डी. मिळाल्यानंतर, विमा पॉलीसी जारी केल्यानंतर ती तुम्हाला दिली जाते?

**उत्तर** — होय. पॉलीसी जारी केल्यानंतर दोन—तीन दिवसांनी दिली जाते.

**प्रश्न** — पॉलीसी जारी केल्यानंतर ज्या दिवशी तुम्ही कंपनीत जाल त्या दिवशी तुम्हाला ती दिली जाते?

**उत्तर** — होय.

४. सन २०१३ साली माझा गैरअर्जदार क्र ०६ सोबत व्यवहार चांगले होते. त्यावेळी माझा कामाचा भार जास्त असल्याने मी प्रिमियमची रक्कम, चेक, डी.डी. जमा करण्यासाठी गैरअर्जदार क्र ०६ च्या कार्यालयात

रोज जात होतो.

५. मला पॉलीसीची प्रत मिळाल्यावर मी ती तपासुन घेतो.

**प्रश्न** – ज्या गाडीची विमा पॉलीसी काढली आहे, त्या गाडीचा अपघात झाल्यास गाडी मालक एजंटला कळवतात ?
**उत्तर** – सदर प्रश्न गैरअर्जदार क्र०६ यांनी त्यांच्या लेखी जबाबात घेतलेल्या बचावाच्या मुद्दयांशी संबंधीत नसल्याने नाकारला.

**प्रश्न** – तुमच्या मार्फत ज्या गाडीची पॉलीसी निघाली आहे त्या गाडीचा अपघात झाल्यास मी कंपनीस कळवितो ?
**उत्तर** – सर्वसाधारणपणे होय. मी कंपनीस लेखी देखिल कळवित असतो. तसा मला अधिकार आहे.

६. माझा एजंट कोड **ईए०००००३९५५६** आहे. विमा पॉलीसीवर माझा एजंट कोड टाकला जातो. डी. डी. सोबत संबंधित पॉलीसीचा प्रपोझल फार्म दिला जातो. त्यावेळी प्रपोझल फार्ममध्ये गाडीचा नंबर, इंजिन नंबर, चेचिस नंबर, गाडी तयार झाल्याची तारीख, प्रिमियमची रक्कम, ज्या पॉलीसीमध्ये गोष्टींसाठी पॉलीसी काढायची आहे त्याची यादी व त्याचे संबंधित प्रमियमची रक्कम असे सर्व तपशिल नमुद केलेले असतात. सदर प्रपोझल फार्मची प्रत आम्ही आमच्याजवळ ठेवत नाहीत.

७. दिनांक २२.०३.२०१३ रोजी ट्रॅक्टरची पॉलीसी मला दिली होती, हे म्हणणे खरे आहे.

**प्रश्न** – त्यावेळी तुम्ही, मी दिनांक १४.०३.२०१३ रोजी डी. डी. दिला तर पॉलीसी दिनांक २२.०३.२०१३ रोजी का जारी केली अशी लेखी हरकत घेतली नाही?
**उत्तर** – लेखी हरकत घेतली नाही, मी तोंडी कळविले होते.

**प्रश्न** – त्यावेळी तुम्ही, मी दिनांक १४.०३.२०१३ रोजी डी. डी. दिला तर पॉलीसी देखिल दिनांक १४.०३.२०१३ पासुनची त्यास असेही लेखी कळविले

नाही?

**उत्तर** – लेखी कळविले नाही. तोंडी कळविले होते.

८. मी दिनांक २२.०३.२०१३ रोजी डी. डी. जमा केला असल्याने मी तसे गैरअर्जदार क्र ०६ ला लेखी कळविले नाही, हे म्हणणे खरे नाही.

**प्रश्न** – सदर ट्रॅक्टरचा दिनांक २१.०३.२०१३ रोजी अपघात झाला, तुम्ही दिनांक २२.०३.२०१३ रोजी डी.डी. जमा केला होता व पॉलीसी देखिल दिनांक २२.०३.२०१३ रोजीची असल्याने त्याची जबाबदारी तुमच्यावर येईल म्हणुन तुम्ही गैरअर्जदार क्र.०६ ला पॉलीसी दुरुस्तीबाबत काहीही लेखी कळविले नाही?

**उत्तर** – मला काहीही माहित नव्हते.

९. मला पॉलीसी मिळाल्याबरोबर मी ती बॅंकेला पाठविली. बॅंकेने मला एप्रिल महिन्यात अपघाताबद्दल कळविले. दिनांक १४.०३.२०१३ रोजी बॅंकेने मला दिलेल्या डी.डी.ची एकुण रक्कम मी आज सांगु शकत नाही.

१०. ट्रॅक्टरच्या पॉलीसीमध्ये त्याचा नोंदणी क्रमांक चुकल्याचे व तो दुरुस्त करुन मिळण्यासाठी ट्रॅक्टर मालकाचा अर्ज माझ्याकडे आल्यावर त्याच दिवशी मी सदर क्रमांक दुरुस्ती करुन देण्यासाठी गैरअर्जदार क्र.०६ ला लेखी अर्ज दिला, त्यावेळी त्यांनी सदर नोंदणी क्रमांक ताबडतोब दुरुस्त करुन दिला व तसा मुळ विमा पॉलीसीवर शेरा मारुन दिला.

११. मी दिनांक १४.०३.२०१३ ला ट्रॅक्टरच्या विमा पॉलीसीच्या प्रिमियम संबंधात डी.डी. गैरअर्जदार क्र.०६ च्या कार्यालयात दिल्याबाबत माझेकडे कोणताही लेखी पुरावा नाही. माझी चुक झाल्याने, हे प्रकरण माझ्यावर येईल व मला नुकसान भरपाई द्यावी लागेल, यासाठी मी आज खाटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खरे नाही.

१२. कंपनीचा दररोज कलेक्शन अहवाल तयार होत असतो.

**प्रश्न** – सदर अहवालात ज्यांची–ज्यांची पॉलीसी जारी केली जाते

त्या एजंटचा कोड नंबर व पॉलीसीचा तपशिल नमुद असतो?

**उत्तर** — जर त्या संबंधी फिडींग केले असेल व ते रेडी फॉर कलेक्शन असेल तर नमुद केलेले असते.

**प्रश्न** — दिनांक १४.०३.२०१३ रोजी तुमच्या १६ पॉलीसी जारी झाल्या ?

**उत्तर** — होय.

**प्रश्न** — दिनांक २२.०३.२०१३ रोजी तुमच्या ७५ पॉलीसी जारी झाल्या ?

**उत्तर** — होय.

**प्रश्न** — दिनांक १४.०३.२०१३ रोजी दिलेल्या तथाकथित डी.डी. संबंधीत सर्व विमा पॉलीसी दिनांक २२.०३.२०१३ राजी जारी झाल्या?

**उत्तर** — त्यांनी फिडींग केले असेल त्यानुसार मिळाल्या.

१३. दिनांक १५.०३.२०१३ ते दिनांक २२.०३.२०१३ पर्यंत दररोज माझ्या विमा पॉलीसी जारी झाल्या आहेत. त्या सर्व मला मिळाल्या आहेत. मी डी. डी. दिनांक २२.०३.२०१३ रोजी जमा केल्याने मी सदर पॉलीसी मागितली नाही, हे म्हणणे खरे नाही. माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद ०८ मधील मजकुर खोटा नमुद केला आहे, हे म्हणणे खरे नाही. मी स्वत:ची जबाबदारी गैरअर्जदार क्र.०६ वर लादण्यासाठी खोटे प्रतिज्ञापत्र दिले आहे, हे म्हणणे खरे नाही.

**फेर तपास :—**

१४. नाही.

| समक्ष | वाचून दाखविले मान्य केले |
|---|---|
| Digitally signed by SONALI NALIN SHAH Date: 2025.07.21 13:21:34 +0530 | Digitally signed by SONALI NALIN SHAH Date: 2025.07.21 13:21:37 +0530 |
| **(सो. न. शाह)** | **(सो. न. शाह)** |
| **सदस्य** | **सदस्य** |
| **मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, पुसद** | **मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, पुसद** |

पुसद.
दिनांक : १४/०७/२०२५